आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२८ मार्च २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गेल्या ११ वर्षांत पायाभूत सुविधांवरच्या अर्थसंकल्पीय तरतुदींमध्ये सहापट वाढ झाल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- ई-गव्हर्नन्स' कार्यक्रमात ठाणे ग्रामीण पोलीस दल अव्वल स्थानी, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रांचं वाटप

- यंदाचा ऊस गाळप हंगाम अंतिम टप्प्यात; राज्यात आतापर्यंत ९८ लाख ८० हजार टन साखरेचं उत्पादन

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेला आजपासून प्रारंभ

**आणि**

- येत्या दोन दिवसांत राज्यात अनेक ठिकाणी वादळी पाऊस तसंच गारपिटीचा इशारा

**<><><><><>**

विकसित भारताच्या निर्माणासाठी अत्याधुनिक पायाभूत सुविधांमध्ये केंद्र सरकार मोठी गुंतवणूक करत असून गेल्या ११ वर्षांत पायाभूत सुविधांवरच्या अर्थसंकल्पीय तरतुदींमध्ये सहापट वाढ केली आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. उत्तर प्रदेशातल्या गौतम बुद्ध नगर जिल्ह्यातल्या जेवर इथं नॉयडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांनी केलं, त्यावेळी ते बोलत होते. महामार्ग आणि एक्सप्रेसवेंवर सुमारे १७ लाख कोटी रुपये खर्च केले. देशभरात एक लाख किलोमीटर महामार्ग जाळं विणण्यात आलं. जवळपास १०० टक्के ब्रॉडगेज नेटवर्कचं विद्युतीकरण झालं आहे, असं प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

भारत आपल्या नागरिकांच्या सामर्थ्यामुळे पूर्ण ताकदीनं पश्चिम आशियातल्या युद्धसंकटाचा सामना करत आहे असंही मोदी म्हणाले…

**(होल्ड बाईट प्रधानमंत्री)**

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री कार्यालयामार्फत आयोजित '१५० दिवस ई-गव्हर्नन्स' या विशेष कार्यक्रमात ठाणे ग्रामीण पोलीस दलानं संपूर्ण राज्यात सर्वोत्कृष्ट पोलीस अधीक्षक कार्यालय असा प्रथम क्रमांक पटकावला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी एस स्वामी यांचा आज प्रशस्तीपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला. राज्यातल्या सर्व शासकीय विभागांच्या कामकाजात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली होती. यामध्ये 'आपले सरकार' योजना, ई-ऑफिस प्रणाली, विभागाचे डॅशबोर्ड आणि वेबसाईट या निकषांवर मूल्यमापन करण्यात आले.

ई गव्हर्नन्स सुधारणा तसंच सेवाकर्मी कार्यक्रमाअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या जिल्हा प्रशासकीय अधिकाऱ्यांचाही मुख्यमंत्र्यांनी प्रशस्तीपत्र देऊन सन्मान केला. पुण्याचे गजानन पाटील, सांगलीचे विशाल नरवाडे, ठाण्याचे रणजित यादव, नाशिकचे ओमकार पवार आणि नागपूरचे विनायक महामुनी हे सर्वोत्तम सीईओ ठरले.

सर्वोत्तम जिल्हाधिकाऱ्यांचा मान जळगावचे रोहन घुगे, ठाण्याचे श्रीकृष्ण पांचाळ, धाराशिवच्या कीर्ती पुजार, लातूरच्या वर्षा ठाकूर घुगे, आणि कोल्हापूरचे अमोल येडगे यांना मिळाला.

**<><><><><>**

पल्स वैद्यकीय परिषदेच्या निमित्ताने आरोग्य क्षेत्रातले धोरणात्मक आणि गुंतवणुकीचे करार झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

देशातला अत्यंत आधुनिक असा बल्क ड्रग पार्क आणि लाईफ सायन्सेस हब लवकरच रायगडमध्ये सुरू होणार असल्याचं फडणवीस म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३२ वा भाग असेल. सकाळी ११ वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, तसंच न्यूज ऑन ए आय आर ॲप वरुन ऐकता येईल.

**<><><><><>**

राज्यात ऊस गाळप हंगाम अंतिम टप्प्यात आला असून, २१० पैकी १८३ साखर कारखाने बंद झाले आहेत. राज्यात आतापर्यंत ९८ लाख ८० हजार टन साखरेचं उत्पादन झालं असून सर्वाधिक सुमारे २३ लाख टन उत्पादन कोल्हापूर विभागात झालं आहे. पुणे विभागात २२ लाख आणि सोलापूर विभागात अंदाजे १९ लाख टन साखरेचं उत्पादन झाल्याची माहिती साखर आयुक्त कार्यालयानं दिली.

**<><><><><>**

महाराष्ट्रात पाईपद्वारे नैसर्गिक वायू पुरवठा नेटवर्कचा विस्तार वेगाने करण्यासाठी केंद्राने तांत्रिक आणि आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी केली. नवी दिल्लीतील बैठकीत त्यांनी पीएनजी विस्तारातील अडचणी मांडल्या. तसंच नवीन गृहनिर्माण प्रकल्पांसाठी पीएनजी जोडणी अनिवार्य करण्याचाही प्रस्ताव त्यांनी मांडला. बैठकीला केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर आणि हरदीप सिंग पुरी यांच्यासह विविध राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**<><><><><>**

सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे मुदतीत पूर्ण झाली नाहीत तर संबंधित ठेकेदारांना दंड करण्यात येईल असा इशारा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांनी दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार सर्व कामे

वेळेत पूर्ण करावीत. पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची कामे पूर्ण करावी अशा सूचना त्यांनी दिल्या. सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाच्या वतीनं त्रयस्थ यंत्रणेमार्फत गुणवत्ता तपासली जाणार असून कामांच्या दर्जाबाबतही तडजोड केली जाणार नाही, असेही भोसले म्हणाले.

**<><><><>**

१९ वी इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आजपासून सुरु होत आहे. बंगळुरू इथं एम. चिन्नास्वामी मैदानावर 'सनरायझर्स हैदराबाद' आणि गतविजेते 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू' या संघांमध्ये थोड्याच वेळात पहिल्या सामन्याला सुरुवात होईल.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

ही स्पर्धा ३१ मे पर्यंत सुरू राहील. गेल्या वर्षी बंगळुरूमधेच आयपीएलच्या अंतिम सामन्याच्या विजयी मिरवणुकीच्या वेळी गर्दीत चेंगराचेंगरी झाल्यानं ११ जणांचा मृत्यू झाला होता. त्यांच्याप्रति संवेदना व्यक्त करण्याच्या उद्देशाने यंदा प्रथेनुसार  उद्घाटन सोहळा होणार नाही असं बीसीसीआयने जाहीर केलं आहे. या ११ जणांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी प्रेक्षागृहातली ११ आसनं पूर्ण स्पर्धेसाठी रिकामी ठेवण्यात येतील.

मुंबईच्या वानखेडे मैदानावर उद्या मुंबई इंडियन्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स यांची लढत होईल.

**<><><><>**

येत्या दोन दिवसांत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊल पडेल, असा अंदाज आहे. याच कालावधीत विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. तर उद्या सांगली, सोलापूर, लातूर, धाराशिव, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली,

गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. तर येत्या दोन दिवसांत अहिल्यानगर, सोलापूर, बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात गारपिट होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

मुंबई, रायगड जिल्ह्याला आज उष्णतेचा यलो अलर्ट दिला आहे. या दोन्ही जिल्ह्यात आज उष्ण आणि दमट हवामान राहील.

**//<><><><><>//**